रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.क्र.एसएसएस/वशी/लेखा/ 1438 /२०२४
दि. 26 JUL 2024

प्रति,
**M/s V.N.Dhoot & Co.**
Chartered Accountants,
A-303, The Hub, 3rd Floor
Opposite Shete Hospital
Parijat Nagar, Nashik-422005

विषयः- पूर्व लेखापरिक्षण कामकाजाबाबत...

संदर्भः १.जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/११८७/२०२४/दि.०८.०७.२०२४ रोजीचा कार्यादेश
२. जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/१३३३/२०२४/दि.१८.०७.२०२४ रोजीचे स्मरणपत्र

उपरोक्त संदर्भ क्र.१चे कार्यादेशान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (रुग्णालयासह) करीता आपल्या फर्मची पूर्व लेखापरिक्षक म्हणून दि.०१.०७.२०२४ ते दि. ३०.०६.२०२७ या तीन वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तथापी, नियुक्ती आदेश प्राप्त होताच त्यातील अटी शर्ती मान्य असलेबाबत स्विकृतीपत्र सादर करणेबाबत आपणांस वारंवार दुरध्वनीवरुन व ईमेलव्दारे संपर्क करण्यात येऊनही आपण प्रतीसाद दिलेला नाही. याशिवाय संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये तीन दिवसांचे आत लेखापरिक्षण कामकाज सुरु करणेबाबत कळविण्यात असतानाही आपण कामकाज सुरु केलेले नाही किंवा कोणताही खुलासा आजअखेर केलेला नाही. यावरुन आपली संदर्भिय आदेशानुसार पुर्व लेखापरिक्षण करण्याची इच्छा नसल्याचे स्पष्ट होत आहे. परिणामी संस्थानचा बहुमुल्य वेळ वाया जाऊन, दैनंदिन बिले अदायगीचे महत्वाचे कामकाजात अडथळा निर्माण झालेला आहे.

सबब कार्यादेशातील अट क्र.१७ अन्वये आपला नियुक्ती आदेश रद्द करुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे लेखापरिक्षण कामी आपले फर्मचे नांव पूढील पाच वर्षासाठी काळ्या यादीत समाविष्ट करणेत येत आहे, यांची नोंद घ्यावी.

(गोरक्ष गाडीलकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी